# विद्यार्थ्यांनी उलगडला व्यसनमुक्तीचा प्रवास

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'शालेय वयात मित्रांच्या वाईट संगतीमुळे मी व्यसनाधीन झालो होतो. त्यांच्यासोबत आणखी राहिलो असतो, तर बिघडलो असतो... मैत्री, प्रेम आणि आकर्षण यातील फरक कळत नव्हता... त्याचा अभ्यास, तब्येतीवर खूप परिणाम झाला... छोट्या-छोट्या गोष्टींचा खूप राग येत असे.. काहीही विचार न करता मी व्यक्त व्हायचो... मात्र, समुपदेशकांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे मी आज सुधारलो. चांगल्या-वाईटाची माहिती झाली,' असे विदारक अनुभव वसंतदादा पाटील विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांनी बुधवारी उपस्थितांसमोर मांडले.

स्वप्नील शिंदे



शालांगण उपक्रमाअंतर्गत वसंतदादा पाटील विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. या वेळी पथनाट्याच्या माध्यमातून विविध विषयांवर प्रकाश टाकण्यात आला.

पंख संस्था आणि क्विकहील फाउंडेशन यांच्यावतीने वसंतदादा पाटील विद्यानिकेतन शाळेत 'शाळांगण' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी शिक्षणाधिकारी दीपक माळी यांनी संवाद साधला. फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, 'सीएसआर'चे प्रमुख अजय शिर्के, पंखच्या अध्यक्ष स्मिता आपटे, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक या वेळी उपस्थित होते.

'शालांगण'अंतर्गत व्यसनमुक्ती, वर्तनसुधारणा, अभ्यासात प्रगती, प्रेम, आकर्षणात न अडकणे, यासह विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत मार्गदर्शन केले जाते. रस्त्यावरून चालताना मुलांनी छेड काढली, तर त्याचा सामना कसा करायचा, त्यांना विरोध कसा करायचा, याबाबत समुपदेशकांनी माहिती दिली. त्यामुळे रस्त्यावरून वावरताना, शाळेतून घरी जाताना आता भीती वाटत नाही, असे काही मुलींनी सांगितले. कमी वयातच व्यसनांच्या आहारी गेलेल्या विद्यार्थ्यांनी समुपदेशनामुळे वाईट सवयी सुटल्याचे सांगितले.